| | | |
|---|---|---|
| | # जनसंपर्क अधिकारी<br>**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**<br>**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**<br>Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in | |

**प्रेसनोट २८४- २३** **दिनांक : - २५/०८/२०२३**

## घरफोडी चोरी करणाऱ्या गुन्हेगाराला अटक - आचोळे पोलीस ठाणे ची कामगीरी.

आचोळे पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात दिनांक १३/०७/२०२३ रोजी रात्रौ ०७.०० वाजे ते दिनांक १४/०७/२०२३ रोजी सकाळी ०८.०० वाजण्याच्या सुमारास तक्रारदार श्री.आशोक रेंछोडभाई वालंड वय ५५ वर्षे, व्यवसाय नोकरी, रा. रुम नं.ई/२०३, न्यु अजय अर्पा. आचोळे गणपती मंदिरा समोर रेल्वे सटेशन जवळ, नालासोपारा पुर्व, ता.वसई, जि.पालघर यांचे घरामधील तिजोरीमध्ये असलेले सोन्याचे,चांदीचे दागीने व रोख रक्कम कोणीतरी अज्ञात आरोपीने घरामध्ये प्रवेश करुन तिजोरीचे लॉकर तोडुन तक्रारदार यांचे संमतीशिवाय चोरी करुन चोरुन नेले बाबतची फिर्याद तक्रारदार यांनी दिल्याने आचोळे पोलीस ठाणे गु.र.नं. ३४५/२०२३ भा.द.वि.स कलम-४५४,४५७,३८० प्रमाणे दिनांक १५/०७/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

वसई-नालासोपारा परीसरात तसेच आचोळे पोलीस ठाणे हद्दीमध्ये घरफोडी चोरीचे गुन्हे घडत असल्याने व सदरचे गुन्हे तात्काळ उघडकीस आणण्याबाबत मा.वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार हे नमुद अज्ञात चोरट्याचा शोध घेत होते.

गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांना गोपणीय बातमीदारामार्फत मिळालेल्या माहीतीच्या वरुन इसम नामे **सोनु बटला उर्फ शोएब साहिबअली राईन वय-१९ वर्षे व्यवसाय-इंटीमेशन ज्वेलरी विक्री रा.रुम नं-१०९, साई मंजिल बिल्डिंग,बोरी कॉलनी, सनशाईन टॉवर,आचोळे रोड,नालसोपारा पु.ता.वसई जि.पालघर यास** जायका हॉटेल येथुन ताब्यात घेवुन त्याचेकडे चौकशी केली असता सदरचा गुन्हा वर नमुद आरोपीत याने केल्याचे तपासात निष्पन्न झाले.आरोपीत याचेकडुन दोन चांदीची मुर्ती त्यामध्ये गणपती व महालक्ष्मी देवीची मुर्ती, एक पितळी समई व ०४ वेगवेळ्या कंपनीचे मोबाईल असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

- उघडकीस आलेले गुन्हे -

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं व कलम |
|---|---|---|
| १. | आचोळे पोलीस ठाणे | गु.र.नं । ३४५/२०२३ भा.द.वि.स कलम-४५४,४५७,३८० प्रमाणे |
| २. | आचोळे पोलीस ठाणे | गु.र.नं । ३८२/२०२३ भा.दं.वि.स.कलम-४५४,४५७,३८० प्रमाणे |

सदरची कामगिरी श्रीमती पौर्णिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उपायुक्त, परिमंडळ-२ वसई, विनायक नरळे, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. बाळासाहेब पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विवेक सोनवणे पोलीस निरीक्षक (गुन्हे) आचोळे पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. यशपाल सुर्यवंशी, पो.उप.निरी. सुहास म्हात्रे,पो.हवा. दत्तात्रय दाईंगडे, शंकर शिंदे,पो.अं.निखील चव्हाण, विनायक कचरे, आमोल सांगळे, मोहनदास बंडगर, मोहन पाईकराव यांनी यशस्वी रित्या केलेली आहे.



---ooo---